गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८



दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक ५७ वा ● शनिवार १३ जुलै २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 57 | Date : 13/07/2024 blow Saturday Page 4 Price 4


# पुरंदावडेत लक्षावधी डोळ्यांनी अनुभवला पहिला गोल रिंगण सोहळा



**पुरंदावडे येथील शेती महामंडळाच्या विस्तीर्ण प्रांगणात गोल रिंगणासाठी पोलीस प्रशासनाच्या सहकार्याने श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानने मैदान तयार करुन घेतले होते. रिंगणाचा तळ सुसज्ज केला होता. भोसरीच्या श्री स्वामी समर्थ आर्टिस्ट राजश्री जुन्नरकर भागवत यांनी रिंगणाच्या मध्यभागी व गोलाकार नेत्रदीपक रांगोळी काढली होती तर अश्वांच्या रिंगणाच्या मार्गावर रांगोळीच्या पायघड्या घातल्या होत्या. सुरुवातीला रथापुढील १ ते २७ दिंड्या अश्वासह रिंगणात आल्या. त्यापाठोपाठ माउलींची पालखी खांद्यावर घेऊन रिंगणात आणण्यात आली. रथापाठीमागील सुमारे २० दिंड्या रिंगण सोहळ्यासाठी आत आणण्यात आल्या. चोपदारांनी पताकाधारी वारकऱ्यांना रिंगणाच्या मध्यभागी घेतले. त्यानंतर रिंगणाला एक प्रदक्षिणा पूर्ण करून माउलींची पालखी रिंगणाच्या मधोमध उभारण्यात आलेल्या शामियानात आणण्यात आली.**

**आज (शनिवारी) हा पालखी सोहळा सकाळी वेळापूरकडे मार्गस्थ होईल. सकाळी पानीव पाटी येथे गोल रिंगण, वेळापूरजवळ धावा व मानाचे भारूडाचा कार्यक्रम झाल्यानंतर सोहळा वेळापूर मुक्कामी पोहोचेल.**

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

माळशिरस/प्रतिनिधीः

या सुखा कारणे देव वेडावला ।
वैकुंठ सोडूनी संतासदनी राहिला ।।

या संत वचनाप्रमाणे संतांच्या समवेत शाश्वत सुखाचा आनंद देणारा स्वर्गालाही लाजवेल असा संत ज्ञानेश्वर माउलींच्या पहिल्या गोल रिंगणाचा अनुपम्य सोहळा पुरंदावडे येथील शेती महामंडळाच्या मैदानात मोठ्या उत्साही व भक्तिमय वातावरणात पार पडला. आज लाखो वैष्णवांनी हा सोहळा आपल्या डोळ्यात साठवित नवचैतन्य भक्तीचा आनंद सोहळा साजरा केला. सायंकाळी ढगाळ वातावरणात हा सोहळा माळशिरस मुक्कामी विसावला. उद्या (शनिवारी) तो वेळापूरकडे मार्गस्थ होईल.

श्री संत ज्ञानेश्र्वर महाराज पालखीचे स्वागत श्री शंकर सहकारी साखर कारखाना व ग्रामपंचायत सदाशिवनगर यांच्या वतीने करण्यात आले. तसेच माळशिरस तालुक्यातील माऊलीच्या पालखीचे पहिले गोल रंगण पुरंदावडे या ठिकाणी पार पडले. माऊलीच्या पादुकाचे व अश्र्वाचे पूजन माजी उपसभापती अर्जुनसिंह मोहिते पाटील साहेब व माजी सभापती वैष्णवीदेवी मोहिते पाटील, विश्वतेजसिह रणजितसिह मोहिते पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

श्री शंकर सहकारी कारखान्याच्या वतीने १० हजार भाविकांना अन्न दान करण्यात आले . या वेळी शंकर कारखान्याचे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर स्वरूप देशमुख साहेब, कार्यकारी संचालक अभिजित डुबल साहेब, रविराज जगताप, सदाशिवनगर सरपंच वीरकुमार जोशी, उपसरपंच उदय धाईजे, दादा पाटील, बीनू पाटील, कारखान्याचे संचालक, विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी स्टाफ उपस्थित होता. रींगन सोहळ्याची तयारी पूरंदावडे ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच राणी मोहिते, उपसरपंच देविदास ढोपे, प्राजक्ता ढोपे, संतोष शिंदे, भगवान पिसे, महादेव बोराडे, विठ्ठल अर्जुन, सुदाम ढगे,दादा मोहिते, धनाजी नाळे, हरी राऊत, दत्तात्रय पिसे, डिश ओवाळ,ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ यांनी केले. श्री संत ज्ञानेश्र्वर महाराज पालखीचे स्वागत श्री शंकर सहकारी साखर कारखाना व ग्रामपंचायत सदाशिवनगर यांच्या वतीने करण्यात आले. तसेच माळशिरस तालुक्यातील माऊलीच्या पालखीचे पहिले गोल रंगण पुरंदावडे या ठिकाणी पार पडले. माऊलीच्या पादुकाचे व अश्र्वाचे पूजन माजी उपसभापती अर्जुनसिंह मोहिते पाटील साहेब व माजी सभापती वैष्णवीदेवी मोहिते पाटील, विश्र्वतेजसिह रणजितसिह मोहिते पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

## ‘आरोग्याची वारी पंढरीच्या दारी’ उपक्रमाची जय्यत तयारी

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीःआषाढी वारीमध्ये लाखोच्या संख्येने भाग घेतात होणाऱ्या गर्दीत भाविकांचे आरोग्य बिघडू शकते भाविकांचे आरोग्य चांगले असले तर वारी चांगली होऊ शकते त्यासाठी आरोग्य मंत्रालयाने आरोग्यासाठी पालखीतील व दिंडीतील लोकांना आरोग्यासाठी सुविधा देण्यात येत आहेत त्रिमूर्ती येणारा भाविकांना मोफत आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आलेले आहे त्यासाठी पंढरीची वारी या संकल्पनेतून प्रत्येक भाविकांना वारकऱ्यांना किती तपासणी करण्यात येणार आहे.महाआरोग्य शिबिर वाखरी गोपाळपूर तीन रस्ता ६५ एकर या परिसरात आरोग्य शिबिराचे अशी माहिती सोलापूर जिल्हा शिवसेनेचे संपर्कप्रमुख शिवाजी सावंत यांनी दिली आरोग्य तपासणी मध्ये वारकऱ्यांची व भाविकांच्या हृदयरोग तपासणी दंत तपासणी एसीजी कान नाक घसा तपासणी डोळ्याची तपासणी अशा अनेक प्रकारच्या तपासण्या एसीजी हे सर्व तपासण्या करून त्यांना चष्मे सुद्धा मोफत देण्यात येणार आहेत.आषाढी सोहळा मुख्य एकादशीला



१७ जुलै रोजी या सोहळ्याकरता माऊली व तुकारामाची पालखी जर मजल करत पालक या पंढरपूरकडे येत असतात येत असताना पंढरपूर मध्ये १८ ते २० लाख भाविक दाखल होत असतात त्यामुळे



भाविकांचे आरोग्याला प्रशासनाने प्राधान्य दिलेले आहे वैद्यकीय डॉक्टर कर्मचारी उपराज्यातील स्टाफ व डॉक्टर कार्यरत आहेत.ारकरी भाविकांसाठी आरोग्य यंत्रणा सज्ज झाले आहे

संत तुकाराम व ज्ञानेश्र्वर महाराज मानाच्या पालखीचे वारकरी व भाविकांना आरोग्याच्या सुविधा प्रशासनाकडून औषध व्यवस्था ही सर्व मोफत देण्यात येत आहे भाविकांना फळे व अण्णा यांची सुद्धा तपासणी करून त्यांना देण्यात येत आहे प्रत्येक ठिकाणी भाविकांना अन्नदान व फळ फळावे देण्यात येत आहेत त्यांची सुद्धा तपासणी करून भाविकांना पिण्याची पाणी सुद्धा शुद्ध तपासणी करून दिले जात आहे त्यांचे आरोग्य चांगले राहावे यासाठी प्रशासन व आरोग्य अधिकारी यांच्या अतिशय चांगल्या प्रकारे काळजी घेऊन त्यांची आरोग्याची व्यवस्था करण्यात येत आहे

भैरवनाथ शुगर चे व्हाईस चेअरमन अनिल सावंत शिवसैनिक जिल्हाप्रमुख महावीर तसेच श्याम गोगाव महावीर नाना देशमुख मुन्ना भोसले उपस्थित होते

## पंकजा मुंडेंसह महायुतीचे ९ उमेदवार विजयी

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई : लोकसभा निवडणुकांनंतर महाराष्ट्रात विधान परिषदेच्या निवडणुका पार पडल्या. शुक्रवारी ११ जागांसाठी १२ उमेदवार मैदानात उतरल्याने गेल्या अनेक दिवसांपासून बहुचर्चित ठरलेल्या निवडणुकीसाठी सकाळी मतदान झाले. त्यानंतर सायंकाळी मतमोजणीला सुरुवात झाली. यात महायुतीमधील घटकपक्ष भाजपचे सर्व पाच उमेदवार निवडून आले आहेत. भाजपच्या पंकजा मुंडे, योगेश टिळेकर, परिणय फुके, अमित गोरखे, सदाभाऊ खोत हे विजयी झाले. तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे कृपाल तुमाने आणि भावना गवळी यांनीही विजय मिळवला.

**भाजपा**
**पंकजा मुंडे – २६ (विजयी)**
**परिणय फुके – २६ (विजयी)**
**योगेश टिळेकर – २६ (विजयी)**
**अमित गोरखे – २६ (विजयी)**
**सदाभाऊ खोत – २६ (विजयी)**
**शिवसेना एकनाथ शिंदे गट**
**भावना गवळी – २४ (विजयी)**
**कृपाल तुमाने – २५ (विजयी)**
**राष्ट्रवादी अजित पवार गट**
**राजेश विटेकर – २३ (विजयी)**
**शिवाजीरावर गर्जे – २४ (विजयी)**
**महाविकास आघाडीचे उमेदवार**
**काँग्रेस**
**प्रज्ञा सातव – २५ (विजयी)**
**शिवसेना उद्धव ठाकरे गट**
**मिलिंद नार्वेकर – २३ (विजयी)**
**राष्ट्रवादी शरद पवार गट**
**जयंत पाटील(शेकाप) – १२ (पराभूत)**



पंकजा मुंडे, परिणय फुके, योगेश टिळेकर, अमित गोरखे, सदाभाऊ खोत, भावना गवळी, कृपाल तुमाने, राजेश विटेकर, शिवाजीराव गर्जे, प्रज्ञा सातव, मिलिंद नार्वेकर

अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही उमेदवार विजयी झाले आहेत. शिवाजीराव गर्जे आणि राजेश विटेकर या दोघांनीही पहिल्या पसंतच्या मतमोजणीत २३ मतांचा कोटा पूर्ण केला. अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडे ४० आमदारांचे संख्याबळ होते. महायुतीच्या मतांची फाटाफूट झाली नाही आणि महायुतीची मते मिळून अजित पवारांच्या दोन्ही उमेदवारांनी विजय मिळवला. शिवाजीराव गर्जे आणि राजेश विटेकर हे आता विधान परिषदेत आमदार म्हणून बसतील. काँग्रेसच्या प्रज्ञा सातव विजयी काँग्रेसच्या प्रज्ञा सातव २६ मते मिळवून विजय झाल्या. तर शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार मिलिंद नार्वेकर यांनी सुरुवातीपासून आघाडी घेतली. मात्र त्यांना विजय मिळवण्यासाठी एका मताची वाट पाहावी लागत होती.

अखेर २५ मते मिळवून नार्वे कर विजयी झाले. या निवडणुकीत महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला असून शेकापचे उमेदवार जयंत पाटील पराभूत झाले आहेत.

## जगदगुरू संत तुकाराम महाराज पालखीचे सोलापूर जिल्ह्यात आगमन

### ✻ नेत्रदीपक रिंगण सोहळ्याने वारकरी सुखावला ✻ जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले पालखीचे स्वागत

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः चला पंढरीसी जावू, बाप रखुमा देविवरा पाहू, ज्ञानेश्र्वर माऊली तुकाराम, जय जय रामकृष्ण हरी...असा हरी नामाचा गजर करीत 'भक्ती रसात' चिंब न्हाहून गेलेल्या जगदगुरू संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याने आज सोलापूर जिल्ह्यात प्रवेश केला. पालखीचे स्वागत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले. जिल्हा प्रवेशानंतर अकलूज येथील सदाशिवराव माने विद्यालयाच्या प्रांगणात नेत्रदीपक असे गोल रिंगण झाले.

जगदगुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालखी स्वागतासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे, पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापिठाचे कुलगुरु डॉ.प्रकाश महानवर, सोलापूर प्र. उपविभागीय अधिकारी अमित माळी, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी दयानंद गोरे उपस्थित होते.



हाती दिंड्या पताका, मुखात अखंड हरी नामाचा गजर आणि विठ्ठलाच्या दर्शनाची आस घेऊन भक्तिमय वातावरणात उन्हा-ताणाची तमा न बाळगता आपल्या लाडक्या विठ्ठलाचे रूप पाहण्यास व त्याच्या पायाचे दर्शन घेण्यासाठी पालखी सोहळ्यातील वारकरी पंढरीच्या वाटेवर लगबगीने चालत आहे.

नीरा नदी ओलांडून संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे सकाळी ८.३० वाजता माळशिरस तालुक्यातील अकलूज येथे आगमन झाले. यावेळी संत तुकाराम महाराजांच्या अश्र्व आणि पादुकाचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. पालखी स्वागतापूर्वी पुणे जिल्हा प्रशासनाच्या वतीने जगदुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्यास भावपूर्ण निरोप देण्यात आला.

**जिल्हाधिकारी यांनी केले सारथ्य** : पालखी स्वागतानंतर पालखीच्या स्वागत ठिकाणापासू पालखीच्या रथाचे सारथ्य जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले. पालखी स्वागत सोहळ्यापूर्वी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी पालखी मार्गावर तात्पुरत्या स्वरूपात उभारण्यात आलेल्या आरोग्य केंद्रास भेट देऊन आरोग्य सेवेची माहिती घेतली.

**नगरपरिषदेच्यावतीने पालखीचे स्वागतः** अकलूज येथील गांधी चौकात अकलूज नगरपरिषदेच्यावतीने जगदगुरु संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचे स्वागत केले.

**नेत्रदीपक रिंगण सोहळाः** जगदगुरु संत तुकाराम महाराज पालखीचे सोलापूर जिल्ह्यातील पहिले गोल रिंगण अकलूज येथील सदाशिवराव माने विद्यालयाच्या प्रांगणात झाले. पताका, हांडे-तुळशी, विणेकरी, मृदंग व टाळकरी यांचे रिंगण झाले. तद्नंतर आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांनी सपत्नीक अश्र्व पूजन केले. । **पान २ वर**

## अक्कलकोट युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब पाटील यांचा राजीनामा

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट तालुक्याचे युवक काँग्रेस तालुका अध्यक्षपदी असताना युवकांना सोबत



तालुक्यातील युवा फळी एकत्र संघटित करून तालुक्यात मरगळलेल्या अवस्थेत असलेले काँग्रेस पक्षला ऊर्जा निर्माण करण्यासाठी रात्र दिवस लोकाचे काम करत सतत जनतेत वावरणारे, युवक काँग्रेस चा एक लिंगायत चेहरा,युवक नेतृत्व म्हणून बाबासाहेब पाटील यांचे तालुक्यात सगळीकडे परिचित आहेत तालुक्यातील युवक व काँग्रेसचे प्रेमी तरुणाने भावी जिल्हा परिषद सदस्य म्हणून बाबासाहेब पाटील कडे बघत असतानाच अचानक तालुकाध्यक्ष पदाचा राजनामा दिल्यामुळे सध्या तालुक्यात उलट सुलट चर्चा चालू आहे

अक्कलकोट तालुक्यामध्ये युवकांची एक फळी निर्माण करून काँग्रेसला पक्ष मजबूत करण्यासाठी प्रयत्नशील, आंदोलन, युवकांचे प्रश्र्न हिरहिरेने । **पान २ वर**

# संपादकीय

## हेच आजचे राजकारण ..

हिदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हे नाव या देशाच्या राष्ट्रीय प्रमुख व्यक्तींमध्ये सूचिबध्द झाले असल्यामुळे त्यांचे नाव आणि छायाचित्र आता सर्व पक्षांचे आणि विचारांचे झाले आहे. त्यामुळे सर्वच पक्ष आणि आघाड्या बाळासाहेब ठाकरे यांचे छायाचित्र आणि नाव आपापल्या निवडणूक प्रचारात आणि आघाडीच्या संकल्पनाम्यात किंवा वचननाम्यात वापरू शकतात. आता हा आनंदाचा आणि अभिमानाचाही मुद्दा आहे आणि अडचणींचाही. ज्या विचारांना बाळासाहेबांनी अनुसरले आणि भविष्यातील पिढ्यांनी ते अनुसरावे आणि पुढे न्यावे म्हणून ज्या समर्थ खांद्यावर त्यांनी आपल्या पक्षाची आणि संघटनेची जबाबदारी टाकली त्या उध्दव ठाकरे यांनाच आपल्याच पित्याच्या न्याय हक्कासाठी सर्वोच्च न्यायालयात सतत न्याय मागावा लागत आहे. म्हणून आता बाळासाहेबांच्या शिवसेनेला आणि उध्दव ठाकरे यांना न्याय देण्याची जबाबदारी ही सर्वोच्च न्यायालयाची आणि मुख्य न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांची आहे. या देशात संविधान सर्वोच्च आहे, हेच कायद्याच्या विद्यार्थ्यांना शिकवले जाते. पण राजकारणाचे धडे गिरवताना आम्हाला हे शिकायला मिळाले की, विधानसभा आणि विधान परिषद तसेच लोकसभा आणि राज्यसभा ही सर्वोच्च सभागृह आहेत आणि त्यांच्यासमोर सर्वोच्च न्यायालय देखील थिटे आहे. कारण लोकशाहीच्या मूळ व्याख्येनुसार लोकांनी लोकांसाठी निवडलेले लोकांचे प्रतिनिधी त्या सभेत बसतात आणि कायदे करतात. ते कायदे मंडळ आहे. या कायदे मंडळाने सर्वानुमते किंवा बहुमताने जे कायदे पारित केलेले असतात ते सर्वोच्च न्यायालयालाही मान्य करावे लागतात. मुख्यमंत्री किंवा प्रधानमंत्रीही जेव्हा राज्यकारभार करतात तेव्हा मंत्रिमंडळ जे ठरवते त्यावर मुख्य वा प्रधानपदी बसलेल्याने शिक्कामोर्तब करणे अपेक्षित असते. पण स्वातंत्र्यानंतर आपल्या देशातील सामान्यांची मानसिकता ही राजा बोले प्रजा डोले, अशी असल्यामुळे जो मुख्य वा प्रधानपदी असेल त्याच्याकडेच निर्णयाचे अधिकार जातात. यामुळे काही वेळेला न्याय आणि संविधानही पायदळी तुडवले जाते. जसे यावेळेस झाले. म्हणूनच आता सगळी भिस्त आहे ती केवळ सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींवरच. निवडणूक आयोग आणि सभापती यांनी दिलेले निवाडे सर्वोच्च न्यायालयात निकालासाठी प्रलंबित आहेत. जातीनिहाय प्राधान्य हेच आजचे राजकारण झाले आहे.

# रिपब्लिकन चळवळीचा लढवय्या हरपला



महाराष्ट्रातील भारतीय दलित पँथरचे लढवय्ये नेतृत्व.. आंबेडकरी चळवळीचा ढाण्या वाघ म्हणून ज्यांची ओळख आहे,असे नामदार रामदासजी आठवले साहेब.. १९९० ला शरद पवार यांच्या मंत्रिमंडळात समाजकल्याण कॅबिनेट मंत्रिपदी निवड झाली. खरं तर आठवले साहेब ज्या वेळेला शपथ घेण्यासाठी राजभवनाकडे निघाले त्यावेळेस त्यांच्या समवेत जे नेते आणि कार्यकर्ते होते त्यामध्ये अक्कलकोट तालुक्यातील काजीकणबस या गावातील तुर्भे, ठाणे झोपडपट्टी मध्ये राहणारे आठवले साहेबांसोबत चळवळीला पुढे नेणारे दमदार नेतृत्व सोपान मामा गायकवाड यांचं आज निधन झाले... गेले अनेक दिवस ते आजारी होते... त्यांचे व्यक्तिमत्व अतिशय प्रेमळ, मनमिळावू तसेच कवी मनाचे सहृदयी होते... त्यांची थेट आठवले साहेब यांच्याशी ओळख पण त्यांनी कधीच बडेजाव केला नाही.. त्याचा त्यांनी कधी ही गैरफायदा घेतला नाही.. आंबेडकरी चळवळ काय असते त्याचा इतिहास हा सोपान मामा होते.. अगदी ते चालतं बोलत पुस्तकं होत.. त्यांच्या प्रत्येक श्र्वासात समाज हित होत तसेच आठवले साहेब यांचा जीव की प्राण होते. साहेबांवर अनेक माध्यमातून टीका होत त्यावेळेवस ते म्हणत ही टीका म्हणजे घरात बसून चळवळ माहित नसलेले लोक आहेत असे ते आवर्जून सांगत.. प्रस्थापित पक्षाकडून अनेक ऑफर असताना सुद्धा त्यांनी निळा झेंडा व आठवले साहेब हे नाव कधी आपल्या विचारातून सोडले नाही.राजकीय फायद्यासाठी त्यांनी आपली निष्ठा कधी सोडली नाही... सामाजिक कार्य काय असते त्याच मूर्तिमंत उदाहरण म्हणजे सोपान मामा..साहेब मंत्री असताना त्यांना अनेक ऑफर होत्या.. त्यांना त्यावेळेस गाडी, बंगला तसेच अनेक ऑफर ते घेतले नाहीत कारण झोपडपट्टी पुनर्वसन झाले पाहिजे.. प्रत्येक कार्यकर्ता आणि समाजातील अनेक लोकांना घरे मिळाली पाहिजेत असा व्यापक समाज हित ते आपल्या समोर ठेऊन होते.. पहिल्यांदा कार्यकर्ते आणि समाजहिताचा वसा कधी ते सोडले नाहीत... त्यांनी चळवळी साठी कोणत्याही प्रस्थापित पक्षासमोर कधी झुकले नाहीत.. संधी असताना कोणतीही व्यक्तिगत डील कधी त्यांनी केली नाही, स्वतःच्या स्वार्थासाठी कधीही कोणापुढे आपला हात पसरला नाही...त्यांची राजकीय कारकीर्द जी मला ज्ञात आहे ते काजीकणबस ग्रामपंचायत उपसरपंच, अनेक वेळा सदस्य म्हणून त्यांनी काम पाहिले आहे..२०१२ ला चप्पळगाव जिल्हा परिषदची ठझख (-) पुरस्कृत अपक्ष निवडणूक लढविली होती.. तसेच २०१७ ला रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) तर्फे त्यांच्या सुनबाई अविनाश यांच्या पत्नी यांनी निवडणूक लढविली.. स्वतःचे पैसे खर्च करून.. घरची परिस्थिती हलाखीची असताना देखील पक्ष निष्ठा तसेच निळा झेंडा राजकारणात टिकला पाहिजे असा मानस ठेऊन रिपब्लिकन चळवळ अक्कलकोट तालुक्यात जिवंत ठेवली...११ जुलै हा दिवस तमाम आंबेडकरी अनुयायांसाठी दुःखद दिवस याच दिवशी १९९७ ला रमाबाई नगर मुंबई येथे हत्याकांड झाले. या आंदोलनात सोपान मामा देखील होते.. त्यांनी सांगितलेली त्या वेळची आठवण म्हणजे याच घटनेने महाराष्ट्राचे आंबेडकरी आंदोलन बदलून त्याचा महाराष्ट्राच्या राजकारणावर खूप मोठा परिणाम होऊन सत्ता परिवर्तन झाले.. रिपब्लिकन ऐक्य त्यांचे विजन होते या ऐक्याच्या बैठकीला आठवले साहेबांसोबत अनेक बैठकांना मामा हजर राहायचे.... वडापाव खाऊन प्रसंगी उपाशी राहून त्यांनी आंदोलनात भाग घेतला... नामांतर लढा, रीडल्सचा लढा, भूमिहीनांचा लढा,गायरान जमीनीचा लढा व झोपडपट्टी पुनर्वसन अश्या अनेक लढ्यामध्ये सोपान मामांनी प्रत्यक्षपणे सहभाग घेऊन अनेकांना न्याय मिळवून दिला.. डिसेंबर २००४ साली अक्कलकोटच्या जुन्या राजवाड्याजवळ खासदार रामदास आठवले साहेबांची जाहीर सभा मा. राजाभाऊ सरवदे साहेब व तालुका अध्यक्ष उत्तम गायकवाड यांच्या नेतृत्वात झाली होती, त्यावेळेस सोपान मामांनी आठवले साहेबांर स्वरचित कविता सादर केली होती तसेच अगदी मोजक्या शब्दामध्ये आपले भाषण त्यांनी केले होते.. आठवले साहेबांनी देखील त्यांची दखल घेऊन सोपान मामांचा नमोल्लेख केला होता .. तेथून महाविद्यालयीन युवकांनी त्यांच्याकडून प्रेरणा घेतली त्यापैकी मी एक लाभार्थी आहे...ते आठवले साहेबांना थेट संपर्क करायचे आणि स्वतः साहेब तो कॉल घ्यायचे... त्यांची पक्षनिष्ठा,रिपब्लिकन आंदोलन समाज परिवर्तनाचे माध्यम आहे असे ते नेहमी म्हणत. मला खास करून ते चळवळ करत असताना त्यातील बारकावे समजावून सांगत असत... जातीयवादी लोकांशी लढा देत असताना अनेक समस्या येत असतात त्यामुळे आपण नेहमी सावधान असणे गरजेचे आहे हे त्यांनी आवर्जून सांगितले.. अक्कलकोट तालुक्यात त्यांनी

जय भिमचा नारा बुलंद केला..त्यांनी खेडेगावातील अनेक गोरगरिबांचे अनेक व्यक्तिगत व सामाजिक कामे आपल्या तब्येतेची काळजी न घेता केलेली आहेत.. त्यांनी मोफत कार्य करत नेहमी समाजाचा विचार केला. चळवळीचा हा लढवय्या आज आपल्यात नाही.. मुंबई झोपडपट्टी पुनर्वसन हे त्यांचे स्वप्न होते... त्यांना एक शासनाचा पुरस्कार देखील मिळणार होता... त्यांनी केलेले सामाजिक व राजकीय चळवळीचे काम असेच पुढे घेऊन जाऊया..हिच खरी त्यांना आदरांजली राहील....

**– डॉ. अरुण अशोक सोनकांबळे**

# उल्हासनगर महानगपालिका क्षेत्रातील महिलांना जास्तीत–जास्त लाभ व्हावा.मुख्यमंत्री–माझी लाडकी बहीण योजना




**दैनिक यशसिध्दि न्यूज**

उल्हासनगर/बाळासाहेब अहिरे : राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांचे आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी महाराष्ट्र राज्याची मुख्यमंत्री–माझी लाडकी बहीण योजना राबविण्यात येत आहे.

तरी सदर योजनेमध्ये उल्हासनगर महानगपालिका क्षेत्रातील महिलांना जास्तीत–जास्त लाभ व्हावा. यासाठी महिलांनी अर्जासोबत लागणारे खालील प्रमाणे कागदपत्र तयार करुन ठेवावे.

आधार कार्ड, (अर्जामध्ये आधारकार्ड वरील नाव नमुद करावे.)

अधिवाश प्रमाणपत्र / जन्म प्रमाणपत्र / शाळा सोडल्याचा दाखला (अधिवाश प्रमाणपत्र उपलब्ध नसेल तर महिलाचे १५ वर्षापुर्वीचे रेशनकार्ड / मतदार ओळखपत्र / जन्म प्रमाणपत्र महिलेचा जन्म परराज्यातील असल्यास पतीचा जन्म दाखला / शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र / अधिवास प्रमाणपत्र उत्पन्न प्रमाणपत्र (रु. २.५० लाखापर्यंत) / पिवळे/केशरी रॅशनकार्ड ,अर्जदाराचे हमीपत्र ,बैंक पासबुक (आधार लिंकअसलेले)अर्जदाराचा फोटो (स्वतः लाभार्थी महिला उपस्थित असणे आवश्यक)

अधिक माहितीसाठी सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती क्र. १ ते ४ व अंगणवाडी मुख्य सेविका यांचेशी संपर्क साधावा.

१. श्री. अनिल खतुरानी, मोबाईल नंबर ९३२०५७०७०७ प्रभाग समिती क्र. १, गोल मैदान, भगवंती नावानी स्टेज, उल्हासनगर – १ शोभा चौगुले (अंगणवाडी मुख्य सेविका) ९०२२०५१६५४

२. श्री. मनिष हिवरे, मोबाईल नंबर ९५९४२३५९९९ प्रभाग समती क्र. २, सपना गार्डन, उल्हासनगर – सुषमा केणी (अंगणवाडी मुख्य सेविका) ८८५००८५२५०

३. श्री. दत्तात्रय जाधव, मोबाईल नंबर ९९२२७८३५३९ प्रभाग समिती क्र. ३. मनपा शाळा नं. १४. उल्हासनगर – ४ विजया कुंभार (अंगणवाडी मुख्य सेविका) ८६५५६४६५६०

४. श्री. गणेश शिंपी, मोबाईल नंबर ९३२३०२८२०६ प्रभाग समती क. ४. नेताजी चौक, श्रुतिका मोहिते (अंगणवाडी मुख्य सेविका) ९८१९५१००८६

पान १ वरुन

## जगदगुरू संत तुकाराम महाराज

त्यानंतर अश्र्व रिंगणी धावले. अश्र्वाचे रिंगणी धावणे उपस्थित अकलूजकरांसाठी एक पर्वणीच ठरली. भक्तिमय वातावरणात पार पडलेला रिंगण सोहळा याची देही याची डोळा अनुभवता आला. डोळ्यात साठवावा अशा नेत्रदीपक रिंगण सोहळ्याचा अभूतपूर्व आनंद प्रत्येक भाविक वारकऱ्यांना सुखावून गेला. यावेळी खासदार धैर्यशील मोहिते पाटील माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी दयानंद गोरे उपस्थित होते.

## अक्कलकोट युवक काँग्रेसचे

मांडणारे युवा नेतृत्व असलेले सलगर जिल्हा परिषद इच्छुक उमेदवार म्हणूनही ज्यांचे नाव चर्चेत आहे अशा युवा नेता बाबासाहेब पाटील यांनी काँग्रेस युवक पदाचा तालुका अध्यक्ष पदाचा राजीनामा दिल्यामुळे अक्कलकोट तालुक्यात चर्चे चा विषय झाला आहे.

बाबासाहेब पाटील यांनी राजीनामा देत असताना वैयक्तिक कारणामुळे राजीनामा देत असल्याचे कबूल करून यापुढेही काँग्रेस हाच माझा पक्ष आणि मा.सिद्धाराम म्हेत्रे हेच आमचे नेते असल्याचे सांगितले आहे परंतु तालुक्यात सर्वच राजकीय पक्षांमध्ये बाबासाहेब पाटील यांच्या राजीनामाचा चर्चाला जोर धरत आहे

# उत्तम मानसिकतेसाठी नकारात्मकतेपासून मुक्ती आवश्यक : आरोग्य सल्लागार नानासाहेब साठे



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधी ‘आपण दैनंदिन कार्य करत असताना आपल्या मनात लाखो विचार डोकावत असतात. ते विचार चांगलेच असतील असे नाही परंतु आलेल्या नकारात्मक विचाराने आपण मात्र गोंधळून जातो. त्यामुळे साहजिकच आपण आपली मानसिकता हरवतो. यासाठी मनामध्ये ज्या ज्या वेळी नकारात्मक विचार येत असतात त्यावेळी त्यांना काढून टाकणं गरजेचं आहे. त्यामुळे आपली मानसिकता उत्तम राहते आणि कामातील उत्साह वाढून आपण यशाकडे जलद गतीने झेप घेवू शकतो.’ असे प्रतिपादन आरोग्य सल्लागार व मार्गदर्शक नानासाहेब साठे यांनी केले. गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरी संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग व कॉलेज ऑफ फार्मसीच्या पदवी व पदविका या चारही महाविद्यालयांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी दि.२७ जून, २०२४ ते ०३ जुलै, २०२४ दरम्यान ‘अटेंडिंग प्रोफेशनल एक्स्पर्टीज– अ होलिस्टिक मेथड’ या विषयावर ‘स्टाफ डेव्हलपमेंट प्रोग्राम’ आयोजित करण्यात आला होता. त्याच्या समारोप प्रसंगी शिक्षणतज्ञ, आरोग्य सल्लागार व मार्गदर्शक नानासाहेब साठे हे मार्गदर्शन करत होते. स्वेरीतर्फे दरवर्षी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. त्याचाच एक भाग म्हणून संस्थेचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, प्रशासन अधिष्ठाता डॉ. आर. आर. गिड्डे, ‘स्टाफ डेव्हलपमेंट प्रोग्राम’ च्या मुख्य समन्वयिका प्रा. एम.एम.भोरे, सह–समन्वयक रजिस्ट्रार आर.जी. झरकर व एस.सी. हलकुडे यांच्या सहकार्याने ही कार्यशाळा पार पडली. ‘स्टाफ डेव्हलपमेंट प्रोग्राम’ ही कार्यशाळा सकाळी व दुपारी अशा दोन सत्रात आठवडाभर चालली. पहिली बॅच २७ नोव्हेंबर, २०२३ ते २ डिसेंबर, २०२३ दरम्यान, दुसरी बॅच दि.२६ फेब्रुवारी, २०२४ ते ०२ मार्च, २०२४ दरम्यान तर शेवटची म्हणजे उर्वरित शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी दि.२७ जून, २०२४ ते ०३ जुलै, २०२४ या कालावधीत पार पडली. तिसऱ्या बॅचमध्ये शिक्षणतज्ञ अभियंता डॉ.मोहन देशपांडे, समुपदेशक प्रा.इसाक मुजावर व शिक्षणतज्ञ नानासाहेब साठे यांनी सहाही दिवस प्रेरणादायी, उत्साहवर्धक व मौलिक विचार मांडून परिस्थिती कशी हाताळायची याबाबत महत्वाच्या टिप्स दिल्या. त्यामध्ये नेतृत्वगुण अंगी येण्यासाठी काय करावे? संवाद कौशल्य साधताना बॉडी लँग्वेज कशी असावी? वरीष्ठांशी संवाद कसा साधावा ? ताण तणावापासून दूर कसे राहायचे ? सकारात्मक कार्य करण्यासाठी कोणकोणत्या बाबींकडे अधिक लक्ष केंद्रित करावे ? चुका टाळण्यासाठी काय करावे ? महत्वाचे काम कमी वेळेत आणि स्मार्ट पद्धतीने कसे करावे? अंगीकृत कार्य आणि दिलेली जबाबदारी पार पाडताना मानसिकतेत बदल न करता कोणती कौशल्ये वापरून योग्य कार्य साधता येईल? हे सर्व करताना नातलग, आपले आरोग्य सुस्थितीत कसे राहील? अडचणी सोडवताना मनाची एकाग्रता कशी असावी ? या विषयांवर तिन्ही वक्त्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वेरी अंतर्गत असलेल्या अभियांत्रिकी व फार्मसीच्या पदवी व पदविका मधील जवळपास ५५ शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या सर्वांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रे वितरीत करण्यात आली.

# नळदुर्ग येथील गावठाण जमिनीवरील अतिक्रमण नियमित करावे व गोवंश हत्या बंदी कायदाच्या नावाखाली अल्पसंख्याक मुस्लिम कुरेशी समाजातील व्यापारी बांधवार होणाऱ्या अन्यायाविरुद्ध प्रतिबंधात्मक उपाय योजना करावी : रिपाइं (आठवले) ची मागणी



वागदरी(एस.के.गायकवाड) : नळदुर्ग ता.तुळजापूर येथील गावठाण जमिनीवरील अतिक्रमण नियमित करावे व तसेच गोवंश हत्या बंदी कायदाच्या नावाखाली अल्पसंख्याक मुस्लिम कुरेशी समाजातील व्यापारी बांधवार होणाऱ्या अन्याय अत्याचारा विरुद्ध प्रतिबंधात्मक उपाय योजना करावी या प्रमुख मागण्या सह अन्य महत्त्वाच्या मागण्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले ) धाराशिव जिल्हा शाखेच्या वतीने वतीने केंद्रीय सामाजिक न्याय व आधिकारता मंत्री रामदास आठवले व संबंधित जिल्हाधिकारी धाराशिव यांना लेखी निवेदना द्वारे करण्यात आल्या आहेत .

या संदर्भा रिपाइं (आठवले )च्या वतीने देण्यात आलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे की तुळजापूर तालुक्यातील बौद्ध नगर नळदुर्ग येथे गट नंबर २९ मधिल गावठाण जमिनी पैकी १ हे =१३ आर इतकी जमीन हरीजन वस्ती वाढीसाठी संपादीत केलेली असून सदर जमीन वर गेल्याअनेक वर्षांपासून घर करून राहत असलेल्या अतिक्रमण धारकांच्या नावे त्यांचे अतिक्रमण नियमित करुन्व् भोगवाटदार म्हणून ७/१२ उताऱ्यावर त्यांची नोंद घेवून त्यांना घरकुल योजनेचा लाभ मिळवून द्यावा तसेच गोवंश हत्या बंदी कायदाच्या नावाखाली अल्पसंख्याक मुस्लिम कुरेशी समाजातील व्यापारी बांधवार होणाऱ्या अन्याय अत्याचार विरुद्ध प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यात यावी आदी प्रमुख मागण्या सह अन्य विविध मागण्या त्वरित मान्य कराव्यात.

रिपाइंच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनावर रिपाइं चे पँथर तानाजी कदम, जिल्हा संपर्क प्रमुख विद्यानंद बनसोडे,जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे, रणजीत गायकवाड, जिल्हा सचिव एस.के.गायकवाड, रिपाइं युवा आघाडी चे जिल्हा कार्याध्यक्ष अरुण लोखंडे, रिपाइं युवा आघाडी चे धाराशिव शहर कार्याध्यक्ष प्रवीण बनसोडे,रिपाइं अल्पसंख्याक आघाडीचे तुळजापूर तालुक्याका अध्यक्ष बाशिद भाई कुरेशी, तुळजापूर शहराध्यक्ष अरुण कदम, माजी नगरसेवक शब्बीर कुरेशी, प्रकाश बनसोडे, जेष्ठ कार्यकर्ते नामदेव आण्णा बनसोडे सह रिपाइंच्या असंख्य कार्यकर्त्यांच्या सह्या आहेत.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# ख्यातनाम गायिका आर्या आंबेकर यांच्या 'स्वर आर्या' एक भाव मैफिल या सदाबहार कार्यक्रम संपन्न



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः गणराया..!, नरसोबाच्या वाडीला जाईन..!, भाग्यदा लक्ष्मी बारम्मा..! श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ..! तारकमंत्र, विठ्ठल..! विठ्ठल...!!, निशंक हो.. निर्भय हो..!, अशा एक ना अनेक मराठी, हिंदी व कन्नड भावगीते व भक्तीगीतांनी ख्यातनाम गायिका आर्या आंबेकर यांच्या 'स्वर आर्या' एक भाव मैफिल या सदाबहार कार्यक्रमाने श्रोते भारावले होते.श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा ३७ वा वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा महोत्सव न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली होत असून, शुक्रवार सायंकाळी ७ वा. 'स्वर आर्या' एक भाव मैफिल, सादरकर्ते – आर्या आंबेकर व सहकलाकार मुंबई ह्या कार्यक्रमाने दुसरे पुष्प संपन्न झाले. या कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन स्टेट बँक ऑफ इंडिया अक्कलकोट शाखेचे व्यवस्थापक विकास खडतकर, भूमिअभिलेखच्या कार्यालयीन अधिक्षक संतोष बिराजदार, डॉ. मनोहर मोरे, डॉ.अर्जुन मुगुटराव, डॉ. अजिंक्य मुगुटराव, डॉ.आसावरी पेडगावकर, डॉ.विवेकानंद करपे, डॉ. ॲड.विजय हर्डीकर, ॲड.भानुदास कोळी, अँड.संतोष खोबरे, न्यासाचे लेखापाल ओंकारेश्र्वर उटगे यांच्या हस्ते करण्यात आले. दरम्यान श्रींची प्रतिमा, नटराज व स्वर्गीय लतादीदी मंगेशकर यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी लोकप्रिय मराठी भावगीते व भक्तिगीते सादरकर्ते – आर्या आंबेकर आणि सहगायक अजित विसपुते, तबला –आदित्य आटले, पखवाज डॉ.राजेंद्र दूरकर, रोहन वणगे, अनय गाडगीळ, रोहित कुलकर्णी, तालवाद्य सूर्यकांत सुर्वे, निवेदिका स्नेहल दामले यांच्यासह मान्यवरांचा न्यासाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी यांच्या हस्ते मंत्र पठणाने पूजन संपन्न झाले. न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे यांच्या वाढदिवसानिमित्त अभीष्टचिंतन करण्यात आले.

यावेळी न्यासाचे विश्र्वस्त अलकाताई भोसले, अर्पिताराजे भोसले, माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे, हिरकणी संस्थेच्या जयश्री मगर, स्वाती निकम, स्मिता कदम, पल्लवी नवले, कविता वाकडे, क्रांती वाकडे, संगीता भोसले, अंजना पवार, उज्वला भोसले, कोमल क्षीरसागर, सुवर्णा घाडगे, छाया पवार, रुपा पवार व न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्र्वस्त भाऊ कापसे, सुरेशचंद्र सूर्यवंशी, दिलीप सिद्धे, राजेंद्र लिंबीतोटे, संतोष भोसले, लक्ष्मण पाटील, काशिनाथ गोळ्ळे, मनोज निकम, प्रा.शरणप्पा आचलेर, अरविंद शिंदे, शीतल फुटाणे, राजु नवले, निखील पाटील, प्रवीण घाडगे, गोटू माने, संजय गोंडाळ, सौरभ मोरे, रोहित खोबरे, स्वामीराव मोरे, टिनू पाटील, महेश दणके, धनंजय गडदे, अमित थोरात, बाळासाहेब घाटगे, प्रसाद हुल्ले, गोविंद शिंदे, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण, श्रोते बहुसंख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन श्र्वेता हुल्ले यांनी केले तर न्यासाचे सचिव शामराव मोरे यांनी रसिकप्रेक्षकांचे स्वागत व आभार मानले. उत्कृष्ठ लाईट व्यवस्था शंभूराजे इलेक्ट्रिकल यांनी केले.

**शनिवार दि. १३ जुलै रोजी सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत आदेश बांदेकर प्रस्तुत 'खेळ मांडीयेला' (खेळ, किस्से, गप्पा, साऱ्या कुटुंबासाठी) हा कार्यक्रम सादर होणार आहे.**


**गुणीजन गौरव : यामध्ये विशेष गौरव पुरस्कार सोलापूर जिल्हा व सत्र न्यायालयाचे जिल्हा सरकारी वकील ॲड.प्रदिपसिंग राजपूत व दक्षिण पोलीस ठाण्याचे महिला पोलीस नाईक ज्योती सगुमळे, पोस्ट ऑफिसचे जी.डी.एस.श्रीमती शांताबाई पोळ, इतिहास अभ्यासक व पुरातत्व संशोधक नितीन अणवेकर यांचा न्यासाच्या वतीने गुणीजन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.**

**गुणवंत विद्यार्थी गौरव : तालुक्यातील इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेत उत्तम गुण मिळवलेल्या ६ गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव न्यासाच्या वतीने करण्यात आला.**

# पंढरीत पाच दिवस कृषी प्रदर्शनाचे आयोजन

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः आषाढी वारीच्या निमित्ताने येथील कृषी उत्पन्न बाजार समिती पंढरपूर यांच्यावतीने कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक कृषी पंढरी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून याचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी दिली. सदर प्रदर्शन १५ ते १९ जुलै असे पाच दिवस भरणार असून या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पालकमंत्री चंद्रकांत पाटील हे उपस्थित राहणार आहेत. तसेच कृषिमंत्री धनंजय मुंडे व पणनमंत्री अब्दुल सत्तार यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.



वारकरी हा शेतकरीच असतो. याचा विचार करून दरवर्षी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात शेतकऱ्यांना विविध विषयांची माहिती मिळावी, यासाठी सदर प्रदर्शन भरविण्यात येते. या प्रदर्शनामध्ये कृषी विभागाच्यावतीने माहितीचे स्टॉल तसेच बी–बियाणे, खते, औषधे, यंत्रसामग्री, ड्रिप इरिगेशन, पंप सोलार, सिस्टीम तसेच विविध इतर माहितीचे स्टॉल असणार आहेत. सदर प्रदर्शन मोफत असून याचा सर्व वारकरी व शेतकरीबांधवांनी लाभ घ्यावा, असे आवाहन बाजार समितीचे सभापती हरिष गायकवाड, उपसभापती राजुबापू गावडे व सर्व संचालकांनी केले आहे.

# आ.समाधान आवताडे यांच्या निधीतून मंजूर झालेल्या सिद्धेवाडी शिरगाव तरटगाव, तसेच माणवाडी, तावशी ता. पंढरपूर येथील रस्त्याच्या कामाचे उद्घाटन

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः कार्यसम्राट आमदार मा.समाधानदादा आवताडे साहेबां यांचे निधीतून मंजूर झालेल्या,सिद्धेवाडी शिरगाव तरटगाव, तसेच माणवाडी, तावशी ता. पंढरपूर येथील रस्त्याच्या कामाचा उद्धाटन समारंभ कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती मा. श्री. सोमनाथ आवताडे यांच्या हस्ते संपन्न झाला.✻

याप्रसंगी बोलताना त्यांनी, 'आज या रस्त्याच्या खडीकरणाच्या उद्धाटनाला आलो आहे. पुढच्या वेळी सिमेंट कॉंक्रिट किंवा डांबरी रोडच्या उद्धाटनाला नक्की येवू', अशी ग्वाही दिली. तसेच या भागाच्या संपूर्ण विकासासाठी आम्ही बांधील आहोत. कोणत्याही प्रकारची अडचण असू द्या, हक्काने या, आपण ती सोडवू असे प्रतिपादन केले. तसेच यावेळी युवक नेते आशिष यादव, मि. ग्रामपंचायत सदस्य श्री.अनिल रामचंद्र यादव, कौशिक यादव,समाधान यादव यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.



यावेळी अनिल यादव यांनी आपल्या मनोगतातून, 'गेल्या कित्येक वर्षांपासून तथाकथित पुढाऱ्यांनी मुद्दामहून प्रलंबित ठेवलेला माणवाडी रस्त्याचा प्रश्र्न, कार्यसम्राट आमदार मा.समाधान दादांनी सोडविल्याबद्दल परिसरातील नागरिकांच्या वतीने जाहीर आभार व्यक्त केले.

यावेळी युवक नेते आशिष यादव, माजी सरपंच पांडुरंग आसबे, माजी सरपंच भारत रणदिवे, पत्रकार बालम मुलाणी, कौशिक यादव, समाधान यादव, राजेंद्र यादव, औदुंबर यादव, धनाजी यादव, रमेश यादव, शहाजी यादव, डॉ आनंद यादव, दत्ता यादव, दयानंद यादव, नानासाहेब यादव, दीपक यादव, शिवाजी यादव, संभाजी यादव, प्रशांत(पप्पू) यादव,आदिनाथ शिंदे, दादा घाडगे, समाधान घाडगे, अवी शिंदे,कुमार घाडगे,राहुल शिंदे, संभाजी घाडगे,धनाजी माने, काकासाहेब शिंदे, तानाजी वाडेकर, दत्तात्रय शिंदे, नितीन वाडेकर, किसन शिंदे, बाळासाहेब गडदे,बालाजी शिंदे, समाधान वाडेकर,सुभाष घाडगे, उत्तम घाडगे, सिद्धेश्र्वर घाडगे, उमेश यादव, समर्थ यादव आदींसह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विशेष अर्थसहाय्य योजनेचा लाभ त्वरित द्यावा: लोजपाचे निवेदन



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

कळंब/सुधाकर रणदिवे : महात्मा फुले मागासवर्गीय महामंडळाचे कर्ज त्वरित वितरित करावे. पीएमईजीपी चे कर्ज माफ करावे, बाबत जातीचे, उत्पन्नाचे, रहिवासी व इतर प्रमाणपत्र वीना विलंब देण्याबाबत, विविध प्रकारचे दाखले त्वरित वितरित करावे ,बाबत विद्यार्थ्यांना भारत सरकारचे शिष्यवृत्ती त्वरित खात्यात जमा करणे बाबत, विशेष अर्थसहाय्य योजनेची मीटिंग त्वरित घेणे बाबत, करीत घेण्याबाबत शालेय, कॉलेज स्तरावर विविध प्रमाणपत्र जमा करण्यासाठी मुदतवाढ मिळावी, आदी मागण्याचा तात्काळ निपटारा करण्यात यावा अन्यथा लोक जनशक्ती पार्टी कळंब मार्फत तीव्र आंदोलन तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

या निवेदनात लोक जनशक्ती पार्टीचे धाराशिव जिल्हाध्यक्ष राजाभाऊ गायकवाड, तालुका अध्यक्ष भारत कदम, तालुका उपाध्यक्ष गौतम हजारे, तालुका युवा अध्यक्ष जावेद शेख, शहराध्यक्ष नागेश धीरे, बाबासाहेब ओव्हाळ, देविदास चिलवंत आदींची उपस्थिती होती.

# सोलापूर जिल्हात नातेपुते येथे बार्टीच्या संविधान दिंडीचे उदघाटन



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे महासंचालक, सुनील वारे यांच्या मार्गदर्शनाखाली संत ज्ञानेश्र्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याबरोबर यावर्षी ही संविधान दिंडी चे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील आराध्य दैवत संत ज्ञानेश्र्वर महाराज आणि जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचे प्रस्थान आषाढी वारीस सुरुवात झाली असून देहू व आळंदीत राज्याच्या कानाकोपऱ्यातून दिंड्या दाखल झालेल्या आहेत. जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा शनिवारी दुपारी दोन वाजता पंढरपूरकडे प्रस्थान होण्याच्या मार्गावर ठिकठिकाणी बार्टीचा संविधान रथ ही संविधाचा प्रचार प्रसार करण्यास सज्ज झाले आहे. आषाढी वारी पालखी सोहळ्यात यंदा वारकऱ्यांचा प्रचंड उत्साह दिसून येत आहे. ११ जुलै रोजी संविधान दिंडी सोलापूर जिल्हात आगमन झाले. व संविधान दिंडी उदघाटन रिपाई महाराष्ट्र उपाध्यक्ष एन के साळवे, लोक सह्याद्री संपदक समीर सोरटे, पलंगे , पुरोगामी चे संपदाक प्रमोद जी शिंदे साहेब, तसेच नातेपुते महावितरण चे शाखा कनिष्ठ अभियंता दीपक के कंकाळ सर,प्रकल्प अधिकारी प्रणिता कांबळे, समतादूत किरण वाघमारे, जोती ओहळ मॅडम उपस्थित होते

बार्टीकडून पालखी सोहळ्यात संविधान दिंडीच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत असून पालखी सोहळ्यात संविधानविषयक प्रबोधन करण्यासाठी संविधान रथ सजविण्यात आलेले आहे. सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग महाराष्ट्र शासन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संविधान दिंडीच्या माध्यमातून वारकरी बांधवांना भारतीय संविधानाची माहिती व्हावी, आपले अधिकार, कर्तव्याची जाणीव व्हावी तसेच संतांच्या समतावादी विचारांचा प्रसार व्हावा हा या संविधान दिडीचा हेतू आहे. भारतीय संविधानाबद्दल तीन प्रत्र विचारून विजेत्यांना भारतीय संविधानाची प्रत, संविधान प्रास्ताविका भेट देऊन सन्मानित करण्यात येत आहे. वारकरी बांधवांना भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकाचे वाटप करून त्यांना भारतीय संविधानाबद्दल आपल्या मूलभूत अधिकार व कर्तव्याची माहिती देण्यात येणार आहे.

# घरगुती गॅस सिलेंडर मधून रिक्षात गॅस भरताना दोघांवर कारवाई

## ५ गॅस सिलेंडर, मोटार जप्त; प्रांत, तहसील, पोलीस यांच्या संयुक्त पथकाची कारवाई

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधी : घरगुती गॅस सिलेंडर मधून अवैध रित्या गॅस रिक्षामध्ये भरत असताना प्रांत, तहसील, पोलीस यांच्या संयुक्त पथकाने दोन ठिकाणी धाड टाकून केलेल्या कारवाईत ५ घरगुती गॅस सिलेंडर, गॅस भरण्यासाठी लागणाऱ्या दोन मोटारी असा २९ हजार ५०० रुपयांचा मुद्दमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी गोटू ऊर्फ निलेश कृष्णा राजुरकर वय–३२ वर्षे , नागेश जाधव वय ४५ वर्ष या दोघा विरूदध जिवनावश्यक वस्तु कायदा १९५५ च्या कलम ३ व कलम ७ अन्वये स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आली असल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

पंढरपूर शहर हे तिर्थक्षेत्र असल्याने शहर परीसरामध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी असते, सदर गर्दीमध्ये घरगुती सिलेंडरचा अवैधरीत्या वापर केल्यास मानवी जिवितहानी होण्याची शक्यता असून,. ही बाब लक्षात घेवुन गुरुवार ११ जुलै रोजी प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसिलदार सचिन लगुंटे, पोलीस निरीक्षक विश्र्वजीत घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर शहरात अवैधरित्या वाहनामध्ये घरगुती गॅसचा भरणा होत असलेल्या ठिकाणी कार्यवाही करण्यात आली. पुरवठा निरिक्षक सदानंद नाईक, पिसाळ, आवटे, भाऊसाहेब शिंदे व कोतवाल प्रल्हाद खरे यांचे संयुक्त पथकाने कारवाई केली. पंढरपूर येथील गाडगे महाराज चौक, भक्ती मार्ग लगत असलेल्या गाळ्यात अवैधरित्या घरगुती वापराच्या गॅस सिलेंडर मधुन रिक्षामध्ये भरत असल्याची माहीती मिळाल्याने सदर ठिकाणी पथक गेले असता गोटू ऊर्फ निलेश कृष्णा राजुरकर वय ३२ वर्षे रा. टाकळी रोड, पंढरपूर या इसमास घरगुती वापरातील एकुण ०३ सिलेंडर व टाक्यातील गॅस काढून वाहनांमध्ये भरण्यासाठी लागणारे इलेक्ट्रीक मोटार (अंदाजे रक्कम १४हजार ९०० रू) या मुदेमालासह रंगेहात





पकण्यात आले.

तसेच अनिल नगर झोपडपट्टी पाण्याच्या टाकीजवळ एका घरामध्ये घरगुती वापराचे गॅस सिलेंडर मधून गॅस रिक्षामध्ये भरत असुन तेथे अवैधरीत्या गॅस विक्री करत असल्याची माहीती मिळाल्याने तातडीने पथक सदर ठिकाणी पोहोचले असता,

एक बंद खोलीत २ घरगुती गॅस सिलेंडर, इलेक्ट्रीकल वजन काटा तसेच टाक्यातील गॅस काढून वाहनांमध्ये भरण्यासाठी लागणारे इलेक्ट्रीक मोटार असे एकुण १४ हजार ६०० रू.चे साहित्य मिळुण आले. या ठिकाणी नागेश जाधव राहत असून मुद्देमाल हा त्यांचाच असलेले समजले. दोन्ही ठिकाणचे सविस्तर वेगवेगळे पंचनामे तयार केले आहेत.

त्यानुसार गोटू ऊर्फ निलेश कृष्णा राजुरकर वय–३२ वर्षे व नागेश जाधव वय ४५ या दोघा विरूद्ध जिवनावश्यक वस्तु कायदा १९५५ च्या कलम ३ व कलम ७ अन्वये स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

तसेच मंदिर परिसरात हॉटेल विक्रेते यांना घरगुती गॅसचा वापर न करता व्यवसायीक गॅस सिलेंडरचा वापर करण्याचे प्रशासनामार्फत आवाहन करण्यात आले आहे.

# अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून स्वामी भक्तांना विशेष सेवा : पंकज पाठक

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली व न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून स्वामी भक्तांना विशेष सेवा भाव मिळत असल्यानेच आज मंडळाचे नांव सर्व दूर पोहचले असल्याचे मनोगत राज्याचे कौशल्य विकास मंत्री ना.मंगलप्रभात लोढा यांचे विशेष कार्य अधिकारी पंकज पाठक यांनी व्यक्त केले. ते श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात सह परिवार आले असता न्यासाचे पुरोहित संजय कुलकर्णी यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. त्यांच्या समवेत राजाकुमार झिंगाडे, संतोष गायकवाड हे उपस्थित होते.

# श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनरांगेत घुसखोरी करणाऱ्या व्यक्तीवर गुन्हे दाखल

## कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांची माहिती.

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः आषाढी यात्रा २०२४ सुरू असल्याने श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शन रांगेत भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी आहे. या दर्शन रांगेत घुसखोरी होऊ नये म्हणून उपविभागीय दंडाधिकारी पंढरपूर यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ दोन अन्वये प्रतिबंधात्मक आदेश दिनांक ११ जुलै रोजी पारित केले आहेत.

तथापि, दिनांक १२ जुलै रोजी रात्री ७ वाजता श्री रमेश उत्तमराव वाघिरे राहणार नांदेड तालुका गंगापूर, औरंगाबाद व श्री महेश वासुदेव घायतिडक राहणार उमरी पारगाव तालुका माजलगाव जिल्हा बीड या व्यक्तींनी श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या मुखदर्शन रांगेतून पदस्पर्शदर्शन रांगेत घुसखोरी केल्याचे सीसीटीव्ही चित्रणाद्वारे व सुरक्षारक्षकाने निदर्शनास आणून दिले आहे. तसेच श्रीच्या मुखदर्शन रांगेत सायंकाळी ६ वाजता व त्या सुमारास एका अज्ञात व्यक्तीने घुसखोरी केली आहे.या तिन्ही व्यक्तींनी घुसखोरी करून उपविभागीय दंडाधिकारी पंढरपूर यांनी दिलेल्या आदेशाचे उल्लंघन केले असल्याने संबंधित व्यक्तीवर पंढरपूर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात येत आहे. श्री वाघिरे व श्री घायतीडक या दोन्ही व्यक्तीस पोलीस विभागाच्या ताब्यात देण्यात आल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

# विधानपरिषद निवडणुकीत पंकजाताई मुंढे विजयी अंढेरा येथे जल्लोष!




**दैनिक यशसिध्दि न्यूज**

बुलढाणा / राहुल साबळे : देवळगाव राजा तालुक्यातील अंढेरा येथे पंकज ताई मुंडे यांचा विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीत पराभव पदरी पडल्यानंतर अखेर विधानपरिषद निवडणुकीत भाजप नेत्या पंकजाताई मुंढे यांनी विजयाचा गुलाल उधळला आहे. पहिल्या पसंतीची २६ मते घेऊन त्यांनी विजय संपादन केला.

त्यांच्या विजयानंतर अंढेरा गावामध्ये विजयी जल्लोषात फटाके फोडुन आनंद उत्सोव साजरा करण्यात आला. पंकजाताईच्या समर्थकांनी फटाके फोडून आनंद उत्सव साजरा केला.यावेळी ताईच्या समर्थक शिवसेना नेते शिंदे गट सुभाष डोईफोडे व तसेच सामाजिक कार्यकर्ते विनोद भाऊ वाघ यांचे खंदे समर्थक माधव आंधळे,कारभारी सानप,बबन वाघ, पंचायत सदस्य पतीप्रमोद सानप संतोष मधुकर सानप. जगन सानप साहेब हरिभाऊ कांयदे,प्रभाकर मुंडे. राजू भाऊ राऊत,संतोष राऊत,रवी सानप.आसाराम सानप(पिटर) मधुकर चव्हाण,नितीन नागरे,किसन बनसोडे ,पंढरी सानप पांडुरंग, कैलास नागरे, पांडुरंग देशमुख, विठ्ठल नागरे उपस्थित होते.

# आंबेडकरी चळवळीचे सोपान गायकवाड यांना अखेरच्या निळ्या सलाम देऊन निरोप

**दैनिक यशसिध्दि न्यूज**



अक्कलकोट/प्रतिनिधीः रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) सोलापूर जिल्हा चिटणीस व आमचे प्रमुख मार्गदर्शक,कवी,कालकथीत सोपान यशवंत गायकवाड (काजिकणबस)यांचा अल्पशा आजाराने काल दुःखद निधन झाल्यांने आज त्यांना आंबेडकरी चळवळीतील प्रमुख नेत्यांच्या उपस्थित अखेरच्या निळ्या सलाम देऊन निरोप देण्यात आली आहे.

अक्कलकोट तालुक्यातील काजिकणबस येथे त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो हीच बुद्ध चरणी सामुहिक बुध्दवंदना घेवून प्रार्थना करण्यात आली.याप्रसंगी शोकाकुल रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) चे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष मा.राजाभाऊ सरवदे,जिल्हा सरचिटणीस,शामसुंदर उर्फ रवि गायकवाड,जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी,सोलापूर शहर सरचिटणीस बसवराज सोनकांबळे,युवकचे जिल्हा सरचिटणीस विजयकुमार पोतेनवरु,शहर जिल्हा उपाध्यक्ष सुग्रीव जेठीथोर,अक्कलकोट तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे, तुळजापूर तालुका अध्यक्ष एस के गायकवाड,युवक तालुका अध्यक्ष अप्पा भालेराव,ता सचिव राजु भगळे,उपाध्यक्ष अंबादास गायकवाड,चंद्रकांत गायकवाड,इस्ममाईल आळंद,सिद्धार्थ गायकवाड,अशपाक अक्सापुरे,कमलाकर सोनकांबळे,शिरवळ शाखा अध्यक्ष उत्तम गायकवाड,उमेश शिवशरण,अक्कसलोट शहर अध्यक्ष अजय मुकणार,शुभम मडिखांबे,व रास पा चे पश्र्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सुनिल बंडगर,पिआरपी चे,विकीबाबा चौधरी,रत्नाकर गायकवाड,तालुका कोषाध्यक्ष कृष्णा धोडमनी,दुधनी शहर अध्यक्ष गोरखनाथ धोडमनी,आंदेवाडीचे सरपंच रमेश धोडमनी,बबलादा सरपंच बाबु निरगुडे,जयभीम आलेगांव,दिपक बनसोडे,सह इतर भीम सैनिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# उपविभागीय अधिकारी यांच्या आदेशानंतर निमगांव वायाळ येथील रेती साठ्याची लावली नायब तहसिलदार यांनी वाट

## उपविभागीय अधिकार्यांच्या आदेशाला खालच्या कर्मचाऱ्यांनी दाखवली होती केराची टोपली

## रेती साठे कमी दाखविण्या मागचा मुख्य सुत्रधार कोण?

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

बुलढाणा/ राहुल साबळेः बुलढाणा जिल्ह्यातील सर्वात जास्त चर्चेत असलेल्या रेती विषय उपविभागीय अधिकारी यांच्या आदेशान्वये निमगांव वायाळ येथील रेती साठ्यावर धडक कारवाई निवासी नायब तहसिलदार डॉ अस्मा मुजावर यांनी कारवाई केली. नंतर त्यांनी मंडळाधिकारी व तलाठी यांना बोलावून पंचनामे करण्याचे आदेश दिले. पण मंडळाधिकारी व त्यातील तलाठी यांनी रेतीचा स्टॉक जास्त असूनही पंचनामा मध्ये कमी दाखवले.व तसेच अनेक ठिकानाची रेती साठे न पाहता सोडून दिले तर या जप्त रेती साठ्याचे पंचनामे सार्वजनीक बांधकाम विभागामार्फत मोजण्याची गावकर्यांची मागणी आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की निमगांव वायाळ येथून मोठ्या प्रमाणात अवैध रेती उखनन सुरु असल्याची तक्रार उपविभागीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त होताच उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांनी मौजे निमगांव वायाळ येथे बैठे पथकाची नियुक्ती ५ जुलै रोजी केली होती यानुसार दिनांक ५ जुलै रोजी शुक्रवार रात्री पथकातील कर्मचारी तलाठी श्रीमंत पांडव व कोतवाल डी एच ढाकणे यांनी त्या दिवसी रात्रभर जागून एकही रेतीचा खडा तस्कुराला काढू दिला नाही. तर दिनांक ६ जुलै रोजी शनिवारी पथकातील कर्मचारी जी. वाय. दराडे व कोतवाल आकाश मघाडे व ७ जुलै रोजी रविवार पथकातील कर्मचारी तलाठी आर बी काकडे व कोतवाल एस बी किंगरे हे




घटनास्थळावर उपलब्य नसल्याने रेती तस्करांनी मोठ्या प्रमाणात अवैध रेतीचे उत्खनन करून गावातील परीसरात मोठ्या प्रमाणात साठा करून ठेवला होता सदर साठ्याची माहीती उपविभागीय अधिकारी प्रा संजय खडसे यांना माहीती होताच त्यांनी स्वतह देउळगांव राजा तालुक्यातील विधानसभा निवडणुकीसाठी मतदार केंद्राला भेट देत असताना त्यांनी तात्काळ नायब तहसिलदार डॉ अस्मा मुंजावर यांना निमगांव वायाळ येथील रेतीचे साठे जप्त करण्यासाठी पाथविले असता नायब तहसिलदार यांनी सदर ठिकानी पाहणी केली असता अनेक ठिकाणी त्यांना रेती चे साठे आढळून आले. त्यानंतर त्यांनी सदरील मंडळाधिकारी व तलाठी यांना बोलावून पंचनामे करण्याचे आदेश दिले . पण मंडळाधिकारी व तलाठी यांनी काही ठिकाणचे रेतीचे स्टॉक न पाहताच सोडून दिले आहे तर अनेक साठ्याचा पंचनामा अत्यंत कमी केला असल्याने गावकर्यामध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी पसरली आहे. सदर रेती साठ्याचे मोजमाप सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्याची मागणी होत असून या साठाचा जाहीर लिलाव करण्याची मागणी ग्रामस्थ करीत आहे निवासी नायब तहसिलदार अस्मा मुजावर यांनी निमगांव वायाळ येथे प्रवेश करताच १३३ ब्रास रेतीचा साठा पकडल्याची माहिती मंडळ अधिकारी दुसरबीड तलाठी जऊळका, विझोरा, कोतवाल सुलजगाव यांनी दिली. वास्तविक पाहता सदरील रेतीचे ढीग पाहता हे हजार ते बाराशे ब्रास आहे. पण या पंचनाम्यात हे रेती साठे जुन मध्ये रेती उत्खनन दिखविले आहे तर पंचनाम्यासाठी बोलविलेले पंच यांची आणि रेती तस्कर यांचे आर्थिक संबंध आहे. सदर रेती साठ्याची मोजमाप हे सार्वजनीक बांधकाम विभागाकडून करण्यात यावे व हे मोजमाप होत नाही तो पर्यन्त या रेती साठ्याचा लिलाव करू नये अशी मागणी ग्रामस्थ करीत आहे आहे. मौजे डिग्रस येथील अवैध रेती साठा गेला चोरीला मौजे डिग्रस येथे नदीकाठी अवैध रेती साठा आहे अशी माहिती मिळाली होती. त्यामुळे तलाठी व मंडळाधिकारी यांना घटनास्थळी पाठवण्यात आले. त्यानंतर त्यांनी ५० ब्रास रेती साठा असल्या बाबतचा रिपोर्ट सादर केला. त्यामुळे सर्व रेती घरकुल चा लाभार्थ्यांना तलाठी व ग्रामसेवक यांच्या समक्ष वाटप करण्याचे आदेश देण्यात आले. परंतु त्या ठिकाणी स्थानिक नागरिक व रेती माफीयांनी वाद निर्माण केल्यामुळे केवळ वीस ब्रास च रेती घरकुल लाभार्थ्यांना देता आली. उर्वरित रेती दुसऱ्या दिवशी देण्याचे ठरले. त्यामुळे त्या ठिकाणी रात्री पोलीस बंदोबस्त व स्थानिक तलाठी यांना थांबवले होते. परंतु पहाटे- पहाटे त्यामधील उर्वरित ३० ब्रास रेती चोरीला गेली, असा रिपोर्ट तलाठी व ग्रामसेवक यांनी सादर केला. त्यामुळे तलाठी यांच्यामार्फत किनगाव राजा पोलीस स्टेशन येथे अज्ञात व्यक्तीच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

# कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात वारी करिअरची उपक्रमाचा शुभारंभ



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेच्या कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात वारी करिअरची उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. ड्रीम फाउंडेशन सोलापूर व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांनी आपली गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी वाचन, चिंतन, मनन करावे या भूमिकेतून ही करिअर वारी काढण्यात आली. या उपक्रमाचा शुभारंभ संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ड्रीम फाउंडेशनचे संस्थापक काशिनाथ भातगुणकी, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, सेमी विभाग प्रमुख दिगंबर जगताप, रा से यो चे कार्यक्रम अधिकारी प्रा राजशेखर पवार, प्रा डॉ बाळासाहेब पाटील, प्रा तुकाराम सुरवसे, प्रा डॉ शितल झिंगाडे, प्रा मधुबाला लोणारी, प्रा मनीषा शिंदे, प्रा विद्याश्री वाले आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना मल्लिनाथ कल्याणशेट्टी म्हणाले की, विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षा देऊन अधिकारी झाले पाहिजेत त्यासाठी अफाट वाचन आवश्यक असते. वारी करिअरची याचा उद्देश देखील हाच आहे. विद्यार्थ्यांचे ग्रंथ मित्र असतात म्हणून ग्रंथाचे वाचन करून स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास केला पाहिजे.

ड्रीम फाउंडेशनचे काशिनाथ भातगुणकी म्हणाले की १७ जुलै पर्यंत वारी करिअरची पालखी ५५ शाळेमधून जाणार आहे.

पालखीमध्ये संविधान, शिवचरित्र, ज्ञानेश्र्वरी तुकारामाची गाथा आदी ग्रंथ ठेवण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांची प्रबोधन करणे हा या वारी पाठीमागील हेतू असेल माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांनी ग्रंथाचे वाचन केले पाहिजे, स्पर्धा परीक्षा दिली पाहिजे, उच्च पदावर आरुढ झाले पाहिजे असे मत काशिनाथ भतगुणकी यानी यावेळी व्यक्त केले. उपक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक दिगंबर जगताप यांनी केले आभार राजशेखर पवार यांनी मानले.

# वारकरी भाविकांसाठी नव्याने पाच ठिकाणी सोयी-सुविधा उपलब्ध : जिल्हाधिकारी

**दैनिक यशसिध्दि न्यूज** पंढरपूर/प्रतिनिधीः आषाढी शुद्ध एकादशी सोहळा १७ जुलै २०२४ रोजी होणार असून, या सोहळ्यासाठी मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक पंढरपूरात येतात. तसेच दिवसेंदिवस पायी पालखीसोहळ्या सोबत येणाऱ्या वारकरी भाविकांची संख्याही वाढत आहे. यात्रा कालावधीत येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये. तसेच त्यांना आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी दिंडींच्या मुक्कामासाठी पंढरपूर शहरालगत नवीन पाच ठिकाणी प्रशासनाकडून सुविधा उपलब्ध करण्यात आल्या असल्याचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सांगितले आहे.आषाढी वारीत येणाऱ्या भाविकांना आवश्यक सोयी-सुविधा तात्काळ मिळाव्यात त्याचबरोबर आरोग्य व स्वच्छतेच्या दृष्टीने कोणतेही गैरसोय होऊ नये यासाठी पंढरपूर रेल्वे मैदान , भटुंबरे, गुरसाळे, गोपाळपूर, वाखरी या ठिकाणी दिंडीच्या मुक्कामासाठी निवारा, पिण्याचे व वापराचे पाणी, शौचालय, विद्युत व्यवस्था, आरोग्य सुविधा आदी आवश्यक सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. दिंडी चालकांनी व भाविकांनीयाबाबत मौजे भटुंबरे ग्रामसेवक संतोष गायकवाड मो. क्र. ८३७९००४६४२, मौजे गुरसाळे ग्रामसेवक अरविंद कुंभार मो.क्र. ९८८११७६५२२, मौजे गोपाळपूर ग्रामसेवक संतोष माळी मो. क्र. ८२०८७९३०४२, ग्रामसेवक रविंद्र शिंदे मो. क्र. ९३७३९४०५७७, मौजे वाखरी ग्रामसेवक सुहास शिंदे तसेच पंढरपूर (रेल्वे मैदान) येथील जागेबाबत पंढरपूर नगरपालिका कर अधिकारी सुप्रिया शिंदे मो. क्र. ९५५२९९९९५४, लिपिक संभाजी देवकर मो. क्र.९९२१२५४००९ यांच्याशी संपर्क साधावा. आषाढी यात्रा कालावधीत दिंडी चालक, वारकरी-भाविक यांना पायाभुत सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी प्रशासनाने आवश्यकती तयारी केली असून, नव्याने निर्माण करण्यात आलेल्या सर्व सुविधायुक्त निवाऱ्यासाठी वारकरी-भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहनही जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.

# मराठा भवनचे भूमिपूजन मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या शुभहस्ते होणार : महेश साठे

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः गेले कित्येक वर्षापासून चर्चित असलेले आणि मराठा बांधवांना अपेक्षित असणाऱ्या मराठा भवन ही पंढरपूर येथील मध्यवर्ती परिसरात मधील असलेल्या जागेमध्ये भूमिपूजनाचा कार्यक्रम महाराष्ट्र राज्याची मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे यांच्या शुभहस्ते मान्य मंत्री महोदय यांच्या उपस्थितीत होणार आहे अशी माहिती सोलापूर जिल्ह्याची शिवसेना शिंदे महेश नाना साठे यांनी आज सकल मराठा समाज बांधवांच्या विचार विनिमय बैठकीमध्ये त्यांनी सांगितले

पंढरपूर शहरातील गजानन महाराज मठ यांच्या पिछाडीस असलेले एकर अशा जागेमध्ये मराठा बांधवांना अपेक्षित असलेली मराठा भवन या भावनांच्या भूमिपूजनाचा कार्यक्रम येथे आषाढी एकादशीच्या निमित्ताने दिनांक १७ जुलै २०२४ रोजी होणार आहे या कार्यक्रमास पंढरपूर तालुक्यातील व पंढरपूर शहरातील मराठा बांधवांनी उपस्थित राहावे असे आव्हान देखील

या मराठा भावनांमध्ये छत्रपती शाहू महाराजांना अपेक्षित असलेली सर्व धर्म समूह प्रेक्षक असलेले पुरोगामी विचाराची भावी पिढी निर्माण करण्याच्या उद्देशाने या सकल मराठा बांधवास एकजुटीने राहण्याची अपेक्षांनी हे मराठा भवन येथे राहत आहे मराठा भावनांमध्ये प्रशस्त असे अभ्यासिका असणार आहे या अभ्यासिका मध्ये पंढरपूर शहर व तालुक्यामधील अभ्यास विद्यार्थ्यांना उच्च पदस्थ असलेले एमपीएससी यूपीएससी या परीक्षेच्या तयारी करण्याच्या उद्देशाने आवश्यक असलेली ग्रंथालय अभ्यासिका या ठिकाणी असणार आहे याचा लाभ बांधवांना तसेच भगिनींना होणार आहे असे पंढरपूर शहरामध्ये



मध्यवर्ती असलेली हे ठिकाण सर्वच बांधवांना अतिशय जवळचे असे असणार आहे या मराठा भवन उभारणीसाठी महाराष्ट्र शासनाने नियोजित जागा दिलेली असून या मराठा म्हणून उभारण्यासाठी पाच कोटी रुपये चा निधीदेखील मंजूर केलेला आहे आणि या मराठा भावनांच्या पुढील बांधकामासाठी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निधीदेखील अपेक्षित आहे या वाढीव निधीची देखील मागणी या कार्यक्रम पासून प्रसंगी करण्यात येणार असल्याची माहिती शिवसेनेचे सोलापूर जिल्ह्याचे शिंदे गटाचे नेते महेश नाना साठे यांनी दिले आहे

मराठा सकल समाजाच्या बैठकीस उपस्थित माजी नगराध्यक्ष नागेश्र्वर भोसले संभाजी ब्रिगेडचे दीपक दादा वाडेकर महाराज समाजाचे जेष्ठ कार्यकर्ते सुनील पाटील मराठा सहल समाधी अध्यक्ष किरण आप्पा भोसले अखिल भारतीय मराठा महासंघाचे अध्यक्ष अर्जुन चव्हाण शिवसेना टाकळीकर शहराध्यक्ष तानाजी मोरे पैलवान माऊली काळे शिवसेना शिंदे गटाचे शहर प्रमुख विश्र्वजीत उर्फ मुन्ना भोसले राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार शहराध्यक्ष सुधीर आबा भोसले पंढरपूर मर्चंट बँक संचालक व संभाजी ब्रिगेड ज्येष्ठ नेते अमरदीप पाटील असे असंख्य कार्यकर्ते व मराठा समाजाचे जेष्ठ त्याचप्रमाणे तरुण या बैठकीला उपस्थित होते